# महाराष्ट्र शासन (गृहनिर्माण विभाग)
# छत्रपती संभाजीनगर व नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम १९८१ आणि ( मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण आणि अदलाबद्ल ) विनियम १९८१ त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभाग दि. ०८/११/२०१३ रोजीच्या अधिसूचना व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणानुसार छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाच्या प्रधानमंत्री आवास योजना (PMAY), म्हाडा गृहनिर्माण योजना व २०% सर्वसमावेशक योजने अंतर्गत एकुण १४१८ निवासी सदनिका/भुखंडाच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

## ऑनलाईन सोडत- जुन २०२५

### अर्जदाराची नोंदणी, ऑनलाईन अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| सोडतीसाठी ऑनलाइन नोंदणीची सुरुवात - | दिनांक ३०/०६/२०२५ दुपारी १२.०० वाजता |
| सोडतीसाठी ऑनलाइन अर्जाची सुरुवात - | दि. ३०/०६/२०२५ दुपारी १२.०० वाजता |
| ऑनलाईन पेमेंट स्विकृती सुरूवात - | दि. ३०/०६/२०२५ दुपारी १२.०० वाजता |
| सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ - | दि. ११/०८/२०२५ रात्री ११.५९ मी. पर्यंत |
| ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम तारीख - | दि. ११/०८/२०२५ रात्री ११.५९ पर्यंत |
| बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरण्याची अंतिम तारीख - | दि.१२/०८/२०२५ संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत. |

| | |
|---|---|
| सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी - | दि. १८/०८/२०२५ दुपारी ०३.०० वाजता |
| सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिध्दी - | दि. २५/०८/२०२५ दुपारी १२.०० वाजता |
| सोडत दिनांक, वेळ व स्थळ - अर्जदारांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल. | |
| सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे-सोडतीच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता | |

ऑनलाईन अर्ज भरावयाच्या कार्यपध्दतीकरीता,सविस्तर माहिती पुस्तिकेकरीता तसेच अर्ज करण्याकरिता अर्जदाराने https://housing.mhada.gov.in किंवा https://www.mhada.gov.in या संकेत स्थळास भेट द्यावी.

**गटनिहाय उत्पन्न मर्यादा खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | उत्पन्न गट | सुधारीत कमाल उत्पन्न मर्यादा (रुपये वार्षिक ) |
|---|---|---|
| | | कमाल उत्पन्न मर्यादा ( छत्रपती संभाजीनगर शहर,नाशिक शहर तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्राकरीता ) संकेत क्र. २६१ ते २६८ करीता |
| १ | अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | रुपये ६,००,०००/- पर्यंत |
| २ | अल्प उत्पन्न गट (LIG) | रुपये ९,००,०००/- पर्यंत |
| ३ | मध्यम उत्पन्न गट (MIG) | रुपये १२,००,०००/- पर्यंत |

टिप :- उपरोक्त ३ ही उत्पन्न गटासाठी किमान मर्यादा निश्चित करण्यात आलेली नसली तरी,

१.अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.

२.अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.

३.मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.

* पंतप्रधान आवास योजनेकरीता कमाल उत्पन्न मर्यादा वार्षिक रु. तीन लाख (३,००,०००) इतकी आहे. (संकेत क्रमांक २५९ ते २६०)

* प्रत्येक अर्जाकरिता माहिती पुस्तिकेत योजनानिहाय नमुद अनामत रक्कमेव्यतीरिक्त अर्जाची किंमत रु. ६००/- + GST रु. १०८/- असे एकूण रु. ७०८/- भरावे लागतील. **ऑनलाईन अर्ज शुल्क** विना परतावा असेल.

* अर्जदारास उत्पन्नाचा पुरावा सन ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीतील सादर करावा लागेल. अर्जदाराचे आयकर विवरण पत्र अथवा तहसिल कार्यालयाचे उत्पन्न दाखला **प्रमाणपत्र** यातील एकुण उत्पन्न ग्राह्य धरले जाईल.

हेल्प लाईन क्रमांक - १) अर्ज नोंदणी करिता-०२२ ६९४६८१०० २) ऑनलाईन पेमेंट करिता- १८००८९१८२९७, ७०६६०४७२१२, support@easebuzz.in व तसेच अधिक माहितीसाठी संपर्क :- छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, सि.बी.एस.रोड, महावीर स्तंभजवळ, छ.संभाजी नगर-४३१००१ व नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन,गडकरी चौक,नाशिक- ४२२००२.

टिप- सोडतीत समावेश असलेल्या योजनाची सविस्तर माहिती,पात्रता निकष,आरक्षण,अर्ज करण्याची कार्यपध्दती,अटी व शर्ती इत्यादी बाबी नमुद असलेली छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळ सोडत जुन-२०२५ ची माहिती पुस्तिका म्हाडाच्या सोडतीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच खालील दिलेल्या क्यु-आर कोड वर उपलब्ध आहे याची नोंद घ्यावी. सदर सोडतीकरीता अर्ज करण्यापुर्वी अर्जदाराने संकेत स्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच अर्ज करावा. * सदनिकेच्या संख्येत बदल संभवनीय असून किंवा इतर कोणत्याही कारणासाठी मा. मुख्य अधिकारी/ छ.संभाजीनगर व नाशिक मंडळ यांनी घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक राहील. तसेच जाहिरातीत किंवा माहितीपुस्तिकेतील कोणत्याही बदल बाबत व छपाईच्या चुकीबाबतचे मा.मुख्य अधिकारी/छ.संभाजीनगर मंडळ व नाशिक यांनी आपले अधिकार राखीव ठेवलेले आहेत.

**माहिती पुस्तिकेसाठी बाजुचा QR code स्कॅन करावा.** ☞

स्वाक्षरित

**शिवकुमार आवळकंठे**

मुख्य अधिकारी

छत्रपती संभाजीनगर व नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ